नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३५४ Issue - 354 | वार मंगळवार दि. १३ मे २०२५ Blow- Tuesday Date 13 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पाकिस्तानला थेट इशारा; अणुबॉम्बच्या नावाखाली ब्लॅकमेल सहन करणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशाला संबोधित केले. नरेंद्र मोदी नेमके काय बोलणार याकडे सर्वांच्या नजरा होत्या. यापूर्वी नोटबंदी आणि लॉकडाऊनच्या मोठ्या घोषणा पंतप्रधानांनी रात्री आठला येत केल्या. यामुळेच आज रात्री देशाला संबोधित करताना नरेंद्र मोदी नेमके काय बोलणार याकडे प्रत्येकाच्या नजरा होत्या. यावेळी नरेंद्र मोदी हे पहलगामवरील हल्ल्याबद्दल बोलताना दिसले. दहशतवाद संपवण्यासाठी लष्कराला पुर्ण सुट दिल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले.

**पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले आहे. 'ऑपरेशन सिंदूर' थांबवल्यानंतर पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला कडक इशारा दिला आहे. भारत पाकिस्तानवर सतत लक्ष ठेवणार आहे. पाकिस्तानने दहशतवादी कारवाया केल्यास त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असे मोदींनी स्पष्ट केले. भारताने ऑपरेशन सिंदूर थांबवले असले, तरी गरज पडल्यास पाकिस्तानला धडा शिकवला जाईल, असेही त्यांनी सांगितले. अणुबॉम्बच्या नावाखाली ब्लॅकमेल करणाऱ्यांना भारत सहन करणार नाही. दहशतवाद्यांना पाठीशी घालण्यासाठी अणुबॉम्बचा वापर खपवून घेतला जाणार नाही, असे मोदींनी ठणकावून सांगितले.**

पाकिस्तानने आमच्या शाळा, कॉलेज, मंदिर, गुरूव्दारा, हॉस्पिटलला टार्गेट केले. पाकिस्तानने पहलगाम हल्ल्यानंतर भारताची साथ देण्याऐवजी दहशतवाद्यांची साथ दिली. भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी अड्डे मिसाईलने उडवली. आम्ही आमची प्रत्युत्तराची कारवाई सध्यासाठी पुढे ढकलली आहे, असेही नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. पुढे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर दहशतवादाविरोधात निती आहे. आम्ही आमच्या पद्धतीने कारवाईला उत्तर देणार आहोत. युद्धाच्या मैदानात देखील आम्ही पाकिस्तानला धूळ चारली आणि ऑपरेशन सिंदूरने नवीन पराक्रम केलाय. तिन्ही भारतीय सैन्य आणि बीएसएफ सतर्क आहेत. सर्जिकल आणि एअर स्ट्राइकनंतर, ऑपरेशन सिंदूर हे दहशतवादाविरुद्ध भारताचे धोरण आहे. पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही, असेही नरेंद्र मोदी यांनी म्हटले. भारताने पहलगामवरील हल्ल्यानंतर पाकिस्तानचे पाणी रोखले आहे.

नरेंद्र मोदी म्हणाले, भारतावर दहशतवादी हल्ला झाला तर त्याला योग्य उत्तर दिले जाईल. भारत कोणताही न्यूक्लियर ब्लॅकमेल सहन करणार नाही, असेही नरेंद्र मोदी यांनी ठणकावून सांगितले आहे. भारत अचूकता आणि निर्णायकतेने प्रहार करेल. जगात जिथे जिथे मोठे हल्ले झाले आहेत, ते सर्व पाकिस्तानमधील दहशतवादी तळांशी जोडले गेले आहेत. बहावलपूर आणि मुरीदके ही जागतिक दहशतवादाची विद्यापीठे राहिली आहेत, असेही मोदी म्हणाले. ऑपरेशन सिंदूरमध्ये मुरीदके हे लष्कराचे मोठे टार्गेट होते. ऑपरेशन सिंदूरनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पहिल्यांदाच देशाला संबोधित केलं. यावेळी त्यांनी धाडसी कारवाईबद्दल सैन्य दलांचं अभिनंदन केलं. पाकिस्तानला खडे बोल सुनावणाऱ्या पंतप्रधान मोदींनी न्यू एज वॉर फेयरमध्ये भारतानं आपलं श्रेष्ठत्व सिद्ध केल्याचा उल्लेख केला. यावेळी त्यांनी स्वदेशी संरक्षण उत्पादनांवर अधिक जोर दिला.

मेक इन इंडियाच्या माध्यमातून भारतानं संरक्षण क्षेत्रातील आपलं परकीय अवलंबित्व कमी केलं. स्वदेशी क्षमतांना प्रोत्साहन देण्यात आलं. ऑपरेशन सिंदूरमधून भारतीय सैन्याची क्षमता दिसली, असं म्हणत मोदींनी मोदींनी मेड इन इंडियाचा विशेष उल्लेख केला. संरक्षण उत्पादनातील आत्मनिर्भरतेकडे त्यांनी लक्ष वेधलं. ऑपरेशन सिंदूरनंतर पंतप्रधानांनी



पहिल्यांदाच देशाला संबोधित केलं. यावेळी त्यांनी दोन्ही देशांत झालेल्या शस्त्रसंधीची पार्श्वभूमी सांगितली. भारतानं ऑपरेशन राबवत पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे तळ, दहशतवादी गटांची मुख्यालयं जमीनदोस्त केली. त्यानंतर पाकिस्तानी सैन्यानं भारतावर हल्ला चढवला. त्यांनी सीमेवर वार केले. पण भारतीय सैन्यानं त्यांच्या छाताडावर वार केला, अशा शब्दांत मोदींनी सैन्याचं कौतुक केलं. न्यू एज वॉर फेयरमध्ये भारतानं आपलं श्रेष्ठत्व सिद्ध केलं आहे. आधुनिक युद्धात भारत तांत्रिकदृष्ट्या आघाडीवर आहे. यातून भारताची भविष्यातील तयारी दिसून येते. स्वदेशी संरक्षण उत्पादनांमुळे ही बाब शक्य झाली असल्याचं म्हणत मोदींनी मेक इन इंडियाचा खास उल्लेख केला. भारताच्या हवाई सुरक्षा यंत्रणेनं शत्रूचे ड्रोन हल्ले, क्षेपणास्त्रं हल्ले हाणून पाडले.

आज बुद्ध पौर्णिमा आहे. जगाला युद्ध नको आहे, त्याचप्रमाणे दहशतवादही नको आहे, असे मोदी म्हणाले. पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना पाकिस्तान कसे पाठीशी घालत आहे, हे जगाने पाहिले आहे. मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या जनाजात खडख आणि पाकिस्तानी लष्कराचे अधिकारी उपस्थित होते, हे उघड झाले आहे. भारत कोणत्याही प्रकारचा आतंकवाद सहन करणार नाही, असे मोदींनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

आता चर्चा फक्त झजघ आणि दहशतवादावरच चर्चा होईल, असे मोदींनी स्पष्ट केले. भारतीय सैन्याने केलेल्या कारवाईमुळे पाकिस्तान घाबरला आहे. त्यामुळे हताश होऊन पाकिस्तान जगाला शांततेची मागणी करत आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय जवानांनी जे शौर्य दाखवले, त्याला मोदींनी सलाम केला. पाकिस्तानसोबत चर्चा झालीच, तर ती फक्त दहशतवाद आणि झजघवरच होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. भारताने सुरुवातीच्या तीन दिवसांतच पाकिस्तानला जेवढे नुकसान पोहोचवले, त्याची कल्पनाही त्यांना नव्हती. त्यामुळे बचावासाठी पाकिस्तान धडपड करत होता. जगामध्ये तणाव कमी करण्यासाठी पाकिस्तान गयावया करत होता. म्हणूनच १० मे रोजी पाकिस्तानी लष्कराने भारताच्या उग्रचजशी संपर्क साधला होता. पंतप्रधान मोदी म्हणाले, भारत पाकिस्तानवर लक्ष ठेवेल. त्यांनी दिलेले वचन पाळले की नाही, हे बघेल. जर त्यांनी कोणतीही दहशतवादी कृत्ये केली, तर त्यांना कडक उत्तर दिले जाईल.

## ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तान दणाणला, हवाई कारवायांच्या केंद्रस्थानाला भारताचा दणका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताच्या सशस्त्र सैन्याने पाकिस्तानच्या लष्करी पायाभूत सुविधांना मोठा हादरा दिला आहे. पाकिस्तानच्या हवाई अस्त्रांचे केंद्रस्थान असणारे नूर खान हवाई तळ भारताने पूर्णपणे उद्ध्वस्त केले आहे. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने ही कारवाई केली आहे. भारतीय संरक्षण दलांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती व्हिडिओ पुराव्यासह जाहीर करण्यात आली आहे. ज्यामध्ये दिसून येते पाकिस्तानच्या हवाई तळांचे आणि मिसाईलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पूर्वीच्या काळात पीएएफ चकलाला म्हणून ओळखले जाणारे नूर खान हवाई तळ पाकिस्तानातील रावळपिंडी येथे स्थित आहे. हे हवाई तळ पाकिस्तानच्या एअर मोबिलिटी कमांडचे केंद्र म्हणून काम करतं. या तळावर साब एरीये एअरबोर्न धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, सी-१३० वाहतूक एअरक्राफ्ट आणि आयएल-७८ एरियल रिफ्युएलिंहग टँकर यांच्यासह उच्च किमतीच्या हवाई मालमत्ता देखील आहेत. आणि या तळावरील हल्ला हा पाकिस्तानच्या हवाई दलासाठी मोठा हादरा आहे, असे हवाई दलाचे अधिकारी ए के भारती यांनी स्पष्ट केले आहे.

या उद्ध्वस्त तळाचे दृश्य दाखवताना ए के भारती म्हणाले, 'आम्ही शत्रूंच्या लांबी आणि रुंदीला लक्ष्य केले आहे.' यासोबतच भारतींनी पाकिस्तानच्या रहीम खान हवाई तळावरील व्हिडिओ दाखवले आहेत. यावेळी असे नमूद केले की, हा हवाई दलाचा महत्वाच्या हल्ला होता ज्यात रहीम खान हवाई तळावर मोठा खड्डा पडला आहे.

भारती यांनी यावेळी भारताच्या संरक्षण दलांच्या कामगिरीचे विशेषत: स्वदेशी आकाश हवाई संरक्षण प्रणालीचे कौतुक केले आहे. त्यांनी म्हटले की, आमच्या युद्धसिद्ध यंत्रणा काळाच्या कसोटीवर खऱ्या उतरल्या आहेत, ज्या भारताला नव्या उंचीवर घेऊन जातात. यातच आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्वदेशी हवाई यंत्रणेने देखील उत्कृष्ट कामगिरी केली. गेल्या दशकभरात सरकारच्या अर्थसंकल्पीय आणि धोरणात्मक पाठिंब्यामुळे शक्तिशाली हवाई संरक्षण वातावरण कार्यान्वित करणे आपल्याला शक्य झाले आहे.

भारती यांनी पाकिस्तानच्या कृत्यावर भाष्य करताना म्हटले, पाकिस्तानी सैन्याने दहशतवाद्यांच्या वतीने हस्तक्षेप करण्याचा निर्णय घेतला हे खूप खेदजनक आहे. म्हणूनच आपल्या लष्कराने प्रत्युत्तर देण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी भारतींनी देशवासीयांना असेही आश्वस्त केले की, भारतीय लष्करी यंत्रणा पूर्ण ताकदीने कार्यरत राहील.

## आज दहावी परीक्षेचा निकाल


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेचे निकाल मंगळवारी दुपारी १ वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर होणार आहेत. विद्यार्थ्यांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाइन पद्धतीने निकाल पाहता येतील, असे मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केले. यंदा मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत राज्यभरात २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी मुंबई विभागातून तब्बल तीन लाख ५८ हजार ८५४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. दहावीच्या ऑनलाइन निकालांनंतर परीक्षार्थींना अनिवार्य विषयांपैकी कोणत्याही विषयातील गुणांबाबत शंका असल्यास गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती आणि पुनर्मूल्यांकन यांसाठी अर्ज करता येणार आहे. हे अर्ज उद्या, बुधवार, १४ मेपासून दाखल करता येतील. अर्ज दाखल करण्यासाठी २८ मेपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

## आम्ही अणुयुद्ध थांबवले : राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वॉशिंग्टन : भारत-पाकिस्तानच्या युद्धबंदीत अमेरिकेने मध्यस्थी केल्याने देशात राजकारण तापले असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठा दावा केला आहे. 'अमेरिका प्रशासनाने भारत आणि पाकिस्तानमधील तात्काळ युद्धविरामासाठी मध्यस्थ म्हणून काम केले आहे.' दोन्ही देशांतील जमिनी, हवाई आणि सागरी अशा सर्व लष्करी कारवाया तात्काळ थांबवण्यासाठी अमेरिकेने प्रमुख भूमिका बजावली आहे, असेही ट्रम्प म्हणाले आहेत.

व्हाईट हाऊस येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना ट्रम्प म्हणाले, शनिवारी माझ्या प्रशासनाने तात्काळ युद्धबंदी करण्यात मदत केली. जी युद्धबंदी आता भारत-पाकिस्तानात कायमस्वरुपी असू शकेल. ज्या दोन्ही देशांकडे मोठी अणु शक्ती आहे.

ट्रम्प यांनी पुढे भारत आणि पाकिस्तानच्या नेतृत्वाने संघर्षाच्या काळात साहस आणि शहाणपणा दाखवल्याबद्दल त्यांचे कौतुक केले आहे. ते म्हणाले, 'मला सांगताना अभिमान वाटतो की, भारत आणि पाकिस्तानचे नेतृत्व अढळ आणि शक्तिशाली होते. त्यांच्याकडे परिस्थितीचे गांभीर्य पूर्णपणे जाणून घेण्याची आणि समजून घेण्याची ताकद, शहाणपण आणि धैर्य आहे,' तर ट्रम्प यांनी शेजारील देशांमधील तणाव कमी करण्यात अमेरिकेच्या व्यापारी बळाची भूमिका होती, असा मोठा दावा देखील त्यांनी केला आहे.

ट्रम्प पुढे म्हणाले, 'आम्ही या संघर्षमय स्थितीत खूप मदत केली आणि व्यापारातही मदत केली. मी म्हणालो, चला आम्ही तुमच्यासोबत खूप व्यापार करणार आहोत.

चला युद्ध थांबवूया. जर तुम्ही ते थांबवाल तर आम्ही व्यापार करणार आहोत. जर तुम्ही युद्ध थांबवले नाही तर आम्ही कोणताही व्यापार करणार नाही.' तर यावेळी ट्रम्प यांनी युद्धबंदी कराराचे महत्वही अधोरेखित केले आहे आणि म्हटले की, 'अमेरिका प्रशासनाने अणुयुद्ध थांबवले आहे.'

ट्रम्प यांनी अणुयुद्धाची भीषणता सांगताना म्हटले, 'आम्ही अणुयुद्ध थांबवले. मला वाटते की, ते एक मोठे अणुयुद्ध असू शकले असते. लाखो लोक मारले गेले असते.' ट्रम्प यांनी पुढे भारत आणि पाकिस्तानातील शांतता प्रक्रिया सुलभ करण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे डी व्हान्स आणि परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांचे आभारही मानले.

### विराटने 'कसोटी' कारकिर्द संपवली

### विराट इंग्लंड दौऱ्यासाठी होता सज्ज, कोचचा धक्कादायक खुलासा

## भारताचा दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून घेतली निवृत्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: भारताचा दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. विराटच्या चाहत्यांसाठी ही धक्कादायक बातमी ठरली. विराटपूर्वी भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माने कसोटीतून निवृत्ती घेतली. रोहितपाठोपाठ आता विराटही निवृत्त झाल्याने भारताला कसोटी संघात मोठा तोटा बसणार आहे. इंग्लंड दौऱ्याच्या अगदी आधी कोहलीने हा निर्णय घेतला. भारतीय क्रिकेटमध्ये, प्रत्येक खेळाडूला पदार्पण करताना कॅप नंबर दिला जातो. हा क्रमांक खेळाडूची ओळख आहे. विराट कोहलीचा कॅप नंबर २६९ आहे. हा नंबर त्याच्या कसोटी कारकिर्दीचे प्रतीक बनला आहे. त्याने निवृत्तीची घोषणा केल्यापासून, हा आकडा चाहत्यांमध्ये चर्चेचा विषय बनला आहे. चाहते याला कोहलीच्या शानदार कारकिर्दीशी जोडत आहेत. कोहलीने आपली १४ वर्षांची कारकिर्द संपवली. गेल्या वर्षी टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर विराट कोहलीने टी-२० आंतरराष्ट्रीय स्वरूपातून निवृत्ती घेतली. कोहलीने कसोटी क्रिकेटला निरोप दिला आहे. कोहली एकदिवसीय स्वरूपात खेळत राहील. कोहलीचे कसोटी आकडे उत्कृष्ट आहेत.

विराटने २०११ या साली कसोटी संघात पर्दापण केले होते. पदार्पणात कोहलीला वेस्ट इंडिजविरुद्ध खेळायला मिळाले होते. लगेचच तीन वर्षानंतर कोहलीला संघाची नेतृत्त्व करण्याची जबाबदारीही मिळाली. कोहलीने २०१४ ते २०२२ या कालावधीत संघाचे कर्णधारपद सांभाळले. विराट कोहलीने १२३ कसोटी सामन्यांमध्ये ३० शतके आणि ३१ अर्धशतकांसह ९२३० धावा केल्या. त्याने २०११ मध्ये कसोटी पदार्पण केले. कोहलीची सरासरी ४६.८५ होती.

विराट कोहलीने २००८ मध्ये भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. पण त्याला पहिली कसोटी खेळण्यासाठी तीन वर्षे वाट पाहावी लागली. २०११ चा विश्वचषक जिंकल्यानंतर, भारतीय संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर गेला. त्याने जमैकामधील किंग्स्टन येथील सबिना पार्क येथे पदार्पण केले. त्याने पहिल्या डावात चार आणि दुसऱ्या डावात १५ धावा केल्या. विराटचे पहिले अर्धशतक



त्याच वर्षी वानखेडे स्टेडियमवर वेस्ट इंडिजविरुद्ध झाले.

**विराट इंग्लंड दौऱ्यासाठी होता सज्ज, कोचचा धक्कादायक खुलासा**

विराट कोहलीने काल कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. विराटच्या एका निर्णयामुळ सगळ्यांनाच मोठा धक्का बसला आहे. सर्वच माध्यामातून विराटने निवृत्ती जाहीर केल्यानंतर भावनिक संदेस लिहिलेला दिसला. भारतीय संघाचे माजी फिरकी गोलंदाज आणि सध्या दिल्ली संघाचे प्रशिक्षक सरनदीप सिंग यांनी विराट कोहलीबद्दल एक धक्कादायक खुलासा केला आहे.

बीसीसीआयच्या माजी निवडकर्त्याने म्हटले आहे की, कोहलीने इंग्लंडमध्ये खेळण्याची आणि तिथे शतक झळकावण्याची वचनबद्धता व्यक्त केली होती. रणजी ट्रॉफी सामन्यादरम्यान कोहलीशी माझी चर्चा झाली होती आणि त्याने सांगितले होते की तो इंग्लंड दौऱ्यावर एक वरिष्ठ फलंदाज म्हणून खेळण्यास तयार आहे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीनंतर, जेव्हा बीसीसीआयने सर्व खेळाडूंना रणजी ट्रॉफीमध्ये खेळण्याचे निर्देश दिले, तेव्हा कोहलीने रेल्वेविरुद्धच्या सामन्यात दिल्ली संघाचे प्रतिनिधित्व केले.

जिओस्टारशी बोलताना सरनदीप सिंग म्हणाले की, कोहलीलाच माहित आहे की तो कसोटीतून का निवृत्त झाला. फक्त त्यालाच माहिती आहे. सर्वांनाच धक्का बसला आहे. याबद्दल कोणतेही संकेत नव्हते. किंवा मी कोणाकडूनही याबद्दल ऐकले नाही. तो आयपीएलमध्ये कसा खेळत आहे ते पहा. तो उत्तम फॉर्ममध्ये आहे. मी त्याला विचारले होते की तो इंग्लंड दौऱ्यापूर्वी काही काउंटी क्रिकेट सामने खेळेल का? तर तो म्हणाला, नाही पाजी, मी इंडिया-अ सामने खेळेन. मी दोन इंडिया-अ सामने खेळेन जेणेकरून मी कसोटी मालिकेची तयारी करू शकेन. त्याच्याकडे एक योजना होती. त्याला अचानक त्याची कसोटी कारकीर्द संपवताना पाहून आश्चर्य वाटते. त्याची तंदुरुस्ती ही समस्या नाही. फॉर्म हा देखील मुद्दा नाही.

सरनदीपने सांगितले की, रणजी ट्रॉफी दरम्यान, त्याने मला सांगितले की मला इंग्लंडमध्ये तीन-चार शतके करायची आहेत. संघातील एक वरिष्ठ फलंदाज असल्याने मला जबाबदारी घ्यावी लागेल. कोहलीला कसोटीत १०,००० धावा पूर्ण करता आल्या नाहीत. त्याने १२३ सामन्यांमध्ये ९,२३० धावा केल्या. त्याच्या नावावर कसोटीत ३० शतके आणि ३१ अर्धशतके आहेत.

संपादकीय....

## भारताचे प्राबल्य

भारताच्या सशस्त्र सैन्याने पाकिस्तानच्या लष्करी पायाभूत सुविधांना मोठा हादरा दिला आहे. पाकिस्तानच्या हवाई अस्त्रांचे केंद्रस्थान असणारे नूर खान हवाई तळ भारताने पूर्णपणे उद्धवस्त केले आहे. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने ही कारवाई केली आहे. भारतीय संरक्षण दलांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती व्हिडिओ पुराव्यासह जाहीर करण्यात आली आहे. ज्यामध्ये दिसून येते पाकिस्तानच्या हवाई तळांचे आणि मिसाईलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पूर्वीच्या काळात पीएएफ चकलाला म्हणून ओळखले जाणारे नूर खान हवाई तळ पाकिस्तानातील रावळपिंडी येथे स्थित आहे. हे हवाई तळ पाकिस्तानच्या एअर मोबिलिटी कमांडचे केंद्र म्हणून काम करतं. या तळावर साब एरीये एअरबोर्न धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, सी-१३० वाहतूक एअरक्राफ्ट आणि आयएल-७८ एरियल रिफ्युएलिंहग टँकर यांच्यासह उच्च किमतीच्या हवाई मालमत्ता देखील आहेत. आणि या तळावरील हल्ला हा पाकिस्तानच्या हवाई दलासाठी मोठा हादरा आहे, असे हवाई दलाचे अधिकारी ए के भारती यांनी स्पष्ट केले आहे. या उद्धवस्त तळाचे दृश्य दाखवताना ए के भारती म्हणाले, 'आम्ही शत्रूंच्या लांबी आणि रुंदीला लक्ष्य केले आहे.' यासोबतच भारतींनी पाकिस्तानच्या रहीम खान हवाई तळावरील व्हिडिओ दाखवले आहेत. यावेळी असे नमूद केले की, हा हवाई दलाचा महत्वाच्या हल्ला होता ज्यात रहीम खान हवाई तळावर मोठा खड्डा पडला आहे. भारती यांनी यावेळी भारताच्या संरक्षण दलांच्या कामगिरीचे विशेषतः स्वदेशी आकाश हवाई संरक्षण प्रणालीचे कौतुक केले आहे. त्यांनी म्हटले की, आमच्या युद्ध-सिद्ध यंत्रणा काळाच्या कसोटीवर खऱ्या उतरल्या आहेत, ज्या भारताला नव्या उंचीवर घेऊन जातात. यातच आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्वदेशी हवाई यंत्रणेने देखील उत्कृष्ट कामगिरी केली. गेल्या दशकभरात सरकारच्या अर्थसंकल्पीय आणि धोरणात्मक पाठिंब्यामुळे शक्तिशाली हवाई संरक्षण वातावरण कार्यान्वित करणे आपल्याला शक्य झाले आहे.



## पडघे येथील जवान सुट्टीला पूर्णविराम देऊन पुन्हा निघाला देशसेवेला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघे गावातील स्वप्निल डोंगरे हा तरुण दोन वर्षांपूर्वी भारतीय सैन्य दलात दाखल झाला. आठ दिवसापूर्वीच तो रजेवर आला असता भारत पाकिस्तान युद्ध सुरू झाले. त्यामुळे त्याला अत्यावश्यक कॉल आल्याने तो पुन्हा देशसेवेसाठी निघाला आहे.

स्वप्निल डोंगरे हा गेल्या दोन दिवसांपासून आजारी असून सुद्धा त्याने देशसेवेला जाण्याचे व कर्तव्य बजावण्याचे ठरवले आहे. डॉक्टरांकडे उपचार घेत असलेला स्वप्निल हा आज देश सेवेकरता निघतो हे देशप्रेम आहे. शैलेश बिडवी यांच्या कार्यालयात पडघा येथील ग्रामस्थांनी स्वप्निलचा सत्कार करून त्याचे औक्षण करून त्याला 'विजयी भव'च्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पडघा ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र विशे, उपसरंच नीता दास,माजी सरपंच शैलेश बिडवी, डॉ. संजय पाटील तसेच विविध नागरिक उपस्थित होते. स्वप्निल सीमेवर जाऊन देशासाठी लढून विजय मिळवून यावा अशी भावना प्रत्येकाने व्यक्त केली. आजारी असताना सुद्धा स्वप्निल देशसेवेसाठी व आपले कर्तव्य बजावण्यासाठी जात असल्याने पडघा परिसरातील व संपूर्ण तालुक्यातील नागरिकांनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.

# समकालीन मराठीवर आंबेडकरवादी कवितेचा प्रभाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रस्तावना : 'आंबेडकरवादी कविता' ही संकल्पना आता वाचक, अभ्यासक आणि रसिकांना खूपच परिचित झाली आहे. आता तिच्यात बदल करून वेगळे नामकरण व्हावे असेही वाटते. ३० वर्षापूर्वी नव्या शीर्षक शोधण्याच्या खूप लाटा उसळल्या होत्या. त्यात मग कोणी परिवर्तनशील साहित्य, कोणी फुले, शाहू, आंबेडकरवादी अशा संकल्पना सुचवल्या होत्या. तर कुणी आंबेडकरी तर आंबेडकरवादी साहित्य असे नामाभिधान सुचविले होते. हे साहित्य हीणकस, प्रचारी, उरबडवे, आक्रस्ताळे, भावक्षोभक व मर्यादित परिघातले कसे आहे. ते साहित्य नावाच्या कसोटीलाच उरत नाही. इत्यादी गोष्टीच्या वादळातून आंबेडकरवादी कविता विकसित पावली. जेणेकरून देश-विदेशातील विचारवंत, साहित्यिकांना ते समजून घ्यावे लागेल. ती गरजही बनली. समग्र महाराष्ट्रातल्या विद्यापीठात आंबेडकरवादी साहित्याचा स्वतंत्रपणे अभ्यासक्रमात समावेश करावा लागला. तर काही महाविद्यालयात 'आंबेडकर विचारधारा' विषय स्नातकोत्तर व पदवीधर अभ्यासार्थ लावला. यावरून समकालीन मराठीवर आंबेडकरवादी कवितेचा प्रभाव पडल्याचे दिसत आहे.

अशा विभिन्न प्रकारच्या अग्नीदिव्यातून अनेकानेक निकषावर पडताळून उमलेले ज्वालाफुल म्हणजे आंबेडकरवादी साहित्य याचे एकमेव प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात एकाकीपणे दिलेली यशस्वी झुंजच आहे. हे कुणीही नाकारणारे नाही. एवढी मात्र खात्री आहे.

आपल्या देशाचा इतिहास म्हणजे दुसऱ्यांचे सर्वस्व दडपून त्यावर उभारलेली इमारतच होय. खोटा इतिहास लिहिण्यास या देशाचा हात कोणीच धरू शकणार नाही. आपल्या विरोधकांची संस्कृती इतिहासावर वरवंटा फिरवून खोट्या विधानांनी आपल्या इतिहासाची पाने भरण्यासाठी मातब्बर लोकांनी लेखणी झिजविली. त्यातच एक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दलितांचे सारे साहित्य उजेडात येऊ शकत नव्हते. दलितांना अक्षरशत्रू समजण्यास येथील प्रवृत्तीनी आपल्या सामर्थ्याचा कसून वापर केला. अस्पृश्यांनी ज्ञानार्जन करू नये म्हणून सनातन्यांच्या मूलभूत ग्रंथातच आज्ञा देऊन ठेवल्या आहेत. ज्ञान मिळू न दिल्यामुळे साहित्याची निर्मिती दलितजन करू शकले नाहीत. या विचित्र व्यवस्थेविरुद्ध म्हणजे साहित्य विद्रोह करण्यासाठी मनातच क्रांती घडावी लागते. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते. जगण्यासाठी, स्वाभिमानासाठी, स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या समाजाला सर्व हत्यारे हातात घ्यावीच लागणार. ध्येयासाठी कला किंवा जीवनासाठी कला या विचारांना ध्येय, साधना यांचा कलात्मक संयोग साधावा. डॉ. आंबेडकरांनी जे क्रांतिकार्य आरंभिले ते साहित्यिकांचे स्फूर्ती स्थान ठरले आहे. हे क्रांतिकार्य पूर्ण करण्यासाठी आम्ही आपले सर्वस्व ताकदीने पणाला लावले पाहिजे,१ असे केशव मेश्राम हे लोकराज्य विषेशांक मधील लेखात म्हणतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण त्यांनी प्राप्त केलेल्या देशा-परदेशातल्या अनेक पदव्या त्यांची पत्रकारिता, त्यांचे ग्रंथ संपादने, प्रामुख्याने सततचे लेखन, उद्यम प्रवासाने व पत्रव्यवहाराने टिकवून ठेवलेला प्रचंड लोकसंग्रह आणि अग्नीतसभा, संमेलने, परिषदा, चर्चा, परिसंवाद, संगीनी, मोर्चे, सत्याग्रह, चळवळी यामध्ये केलेले वक्तव्य आणि भाषणे या सगळ्या अथक परिश्रमातून त्यांच्यासोबतचे कार्यकर्ते व सहकाऱ्यांना, त्यांनी प्रभावित झालेल्या जनतेला भारून टाकले होते. मूकनायक, बहिष्कृत भारत व जनता या नियतकालिकांनी हे त्यांचे विचार, धोरणे आणि भूमिका लोकमाणसात रुजविण्याची मोलाची कामगिरी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पाहिजे असलेला पुढच्या चळवळीचा कार्यकर्ता यातूनच उभा ठाकला आपल्या अपेक्षांची अक्षरे उमटवू लागला. बहुजन कल्याणाचे ध्येय काही अंशाने मिळविता आले. डॉ. आंबेडकरांना आपल्या इतिहासाचे वेगळे निर्वचन करायचे असल्यामुळे त्यांनी ग्रंथाची निर्मिती केली.

देश सुखी व्हावा, समृद्ध व्हावा, नि सभ्य व्हावा. येथे समानता नांदावी महाराष्ट्राचे नंदनवन व्हावे. केवळ कल्पकतेचे डोळे लावून जीवनातील सत्य दिसत नसते ते सत्य हृदयाने मिळवावे लागते. 'पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे.' प्रतिभेला वास्तव आवश्यक आहे. कल्पनेलाही पंख असणे आवश्यक असते. अनुभूतीलाही सहानुभूतीची जोड नसेल, तर आपण काय लिहितो याचा अंदाज लागत नाही. वीरांचे यशोगीत गाणे, शाहिरीचा धर्म आहे. अन्यायाविरूद्ध आवाज बुलंद करणे हे साहित्याचे कार्य आहे. लोकनिष्ठा, देशनिष्ठा ही तिची लेणी आहे. कारण मराठी काव्याचा, शाहिरीचा आद्यजनक हा दलित होता. याच शाहिरीला आम्ही शुद्रांनी पोसले, जपले आणि वाढविले. कवणांची बाडे दलित वाड्यात कुजत आहेत पण विद्वानांना त्याची दखल मुळीच नाही.

कोणतीही महान क्रांती दूरदृष्टी हेतूने महापुरुषांच्या मेंदूत प्रथम आकार घेते. अशिक्षित, असंघटित लोकांना परिवर्तनाच्या उज्ज्वल प्रकाशाकडे नेले पाहिजे. त्यांच्या मनात नवविचारांची बिजे आणि आकांक्षाची कणसे वाढविली पाहिजेत. न खचता हे सर्व करण्याची गरज सातत्याने बाबासाहेबांनी हेरली होती. महात्मा जोतिबा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाने समाजातील असत्याविरुध्द आवाज बुलंद करण्यासाठी सत्यशोधक जलशांचा आधार घेतला होता. प्रबोधनाच्या चळवळीला जलशांनी गतिमान ठेवले. हे समजून घेतले पाहिजे. आंबेडकरवादी विचार, कविता, कवने, जलसे, गाणी, तमाशे आदींनी सर्व महाराष्ट्र मुळापासून हादरायला लागला२. अशाप्रकारे प्रा. विठ्ठल शिंदे हे सम्राट या जयंती अंकामध्ये म्हणतात.

समकालीन मराठी किंवा आंबेडकरवादी साहित्य असो आधी कवितेचाच जन्म झाला आहे. लोककवीनी कवणातून परंपरेबरोबरच आंबेडकरवादी विचारांची लावणी करण्याचे मोलाचे कार्य केले. यामधून दलित आकांक्षाची, सृजनक्षमतेची काव्यबाग बहरली. किसन फागु बन्सोड, हरिहरराव सोनुले, भीमराव कर्डक, केवळ इंगळे, केसव सुखा आहेरे, नंतरचे वामनदादा कर्डक, श्रीधर ओहोड, बी. राजानंद, नागोराव पाटणकर, दिनकर दिनबंधू शेगावकर,



अण्णा भाऊ साठे, शाहीर भोसले, विठ्ठल उमप, श्रावण यशवंते इत्यादी लोकांनी दलित साहित्यातील आरंभीची काव्यसृष्टी निर्माण केली. प्रेरणेच्या वाटेवर पाऊल ठेवताना बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, योगेन्द्र मेश्राम, अर्जुन डांगळे, त्र्यंबक सपकाळे, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, दया पवार, डॉ. यशवंत मनोहर, सुरेखा भगत, ज्योती लांजेवार, युवराज गंगाराम, विद्याधर बन्सोड, सुरेश खोब्रागडे व संजय गोडघाटे यांच्या अस्वस्थ मनाच्या प्रत्येयकारी दर्शन घडविणाऱ्या आंबेडकरवादी कवितेचा प्रचंड प्रवाह निर्माण झाला. मनोवेदना प्रवाही व प्रभावीरीतीने काव्यप्रांतात नवे प्रकाश दिले आहे असे वाटते. जुने विचार, प्रथा, परंपरा, आणि रूढी विरुद्ध आवाज उठवणारी आहे कविता ही आंबेडकरी कवींची आहे.,३ असे आपल्या अनोख्या शैलीत डॉ. यशवंत मनोहर म्हणतात.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद उत्तम कांबळे, फ. मु. शिंदे व डॉ. यशवंत मनोहर यांनी आंबेडकरी प्रेरणेमधूनच स्वीकारली होती. १९६० नंतर आंबेडकरवादी कवितेचा प्रभाव तीव्र वाढून ते विद्रोही व आंबेडकरवादी साहित्याच्या स्वरूपात पुढे आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महत्त्वपूर्ण प्रेरणेतूनच आजही निर्माण होते. हे वास्तविक सत्य जगाला दिसते. आंबेडकरवादी कविता अनुभवाच्या मुशीतून साकारली आहे. हा अनुभव माणुसकीला व मानवतेला प्रचंड विदीर्ण करणारा आहे. माणसे संपतात पण त्यांचे कर्तृत्व, लढे नुसतेच आठवणीत उरत नाहीत. तर इतिहासाची साक्ष प्रभावीपणे व प्रेरणादायी ठरतात.

आंबेडकरवादी कवितेला विश्व साहित्याचे स्थान मिळविण्याची जिद्द जोपासयला हवी. एका झुंजार योद्ध्याची वैचारिक आग त्याला ऊर्जेसारखी प्राप्त होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणा स्त्रोतातून उगम झाल्यामुळे विश्व साहित्यात ही कविता 'मानाचा तुरा' रोवून आपल्या समकालीन मराठीचे ऋण फेडेल असे वाटते.

### आंबेडकरवादी कवितेची निर्मिती

मानवतावादी विचारांनी जी कवीमने चळवळे व आंदोलित झाली, त्या कवीमनांनी जी कविता जन्माला घातली ती कविता म्हणजे 'आंबेडकरवादी कविता' म्हणून मान्यता पावली. आंबेडकरवादी कवितेच्या रूपाने विकसित झाले. १९५६ ला बौद्ध धम्माचा स्वीकार झाला व त्यानंतर आंबेडकरी कवितेला प्रचंड वेग आला. यापूर्वी आंबेडकरी कवितेची निर्मिती झाली नाही, असे नाही. धम्म स्वीकारामुळे जे आत्मभान दलित कवींना आले, ते आत्मभान खंबीरपणे कवितेत आविष्कृत उतरू लागले. त्यांच्या आविष्कारातून स्वातंत्र्याचा अर्थ स्पष्ट झाला आहे. मुक्तीचा अर्थ व्यक्त झाला आहे. या मुक्तीतून व्यक्तीचे अस्तित्व सिद्ध होते. अस्तित्वासाठी केलेला संघर्ष कवितेच्या ओळीतून व्यक्त होतो. अस्तित्वासाठी संघर्ष हीच आंबेडकरवादी कवितेची प्रेरणा आहे. ही प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रत्येक कविमनात निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसते,४ असे डॉ. आशा धावडे आपल्या प्रस्तावनेत म्हणतात.

वैचारिक व आंबेडकरवादी कवितेने अन्यायाच्या प्रतिकारास कवींनी सिद्ध केले. धर्मांतराने आंबेडकरवादी कवींची हृदये पेटून उठली आहेत. मने वादळी बनली आहेत. वादळांनीच शब्दाचे आगाज घेतले आहे. आगीने लय घेतली आहे. यामुळेच सुंदर धगधगती कविता जन्माला आली आहे. कवितेला धगधगते रूप धम्म स्वीकारल्यामुळे प्राप्त झाले आहे. हे कायम सत्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांसोबत धर्माचा त्याग केला व धम्माचा स्वीकार केला. धम्मस्वीकारामुळे जगण्याची नवी दिशा व ऊर्जा मिळाली. धम्म स्वीकाराने शोषणमूल्ये नाकारली. धम्म स्वीकार म्हणजे शोषणमूल्यांचा त्याग आहे. प्रकाशमूल्यांचा स्वीकार आहे. ही प्रकाशमूल्ये म्हणजे न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता होय. या प्रकाशमूल्यांच्या स्वीकाराने ठिसूळ, निर्थक व कुचकामी श्रद्धास्थाने उद्धवस्त झाली आहेत. प्रचंड आत्मविश्वासाने आंबेडकरवादी कवी वास करू लागले. नवी समाजव्यवस्था निर्माण करून व स्वीकारून काव्याची निर्मिती करू लागले. क्रांतीचे स्वप्न आंबेडकरवादी कवी पाहू लागले व जगाला ती स्वप्ने दाखवू लागले. क्रांतीचे स्वप्न पाहण्याचे बळ या कवींना धम्मप्रभावामुळेच लाभले, ही वस्तुस्थिती आहे. कारण 'धम्माचे प्रयोजन या विश्वाची पुनर्रचना करणे' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

आंबेडकरवादी कवींच्या कवितेतील जाणिवा सामाजिक आहेत. पूर्वीच्या मराठी कवींच्या फार पुढची आहे. ही जाणीव अधिक टोकदार बिनतोड, अधिक प्रखर आणि खऱ्या अर्थाने संपूर्ण विद्रोही आहे. निरीश्वरवादी, अनात्मवादी, इहवादी, विज्ञानवादी व बुद्धिप्रामाण्यवादी आहेत. ते 'लकीर के फकीर' नाहीत. ते शब्दप्रामाण्यवादी नाहीत. कर्मविपाक पूर्वजन्म, पुनर्जन्म, मंदिरसंस्था, पूजापरंपरा या शोषकांच्या पूजनीय बाबी त्यांना कुठल्याही बाबीवर मान्य नाहीत. धर्म, वंश, वर्ण लिंग, आणि जात हे शोषणाचे अत्यंत क्रूर भीषण रूप होय. कवींनी शोषणयंत्रणेतील मंदिरसंस्था, कर्मविपाक, चमत्कार, संचित आणि पूजा बांधणारे ग्रंथ, पंथ आणि महंत, ईश्वर, आत्मा, साधुसंत इ. सर्वच आघाड्यांविरुद्ध विद्रोह पुकारला आहे. आंबेडकरी कवींनी मराठी कवितेला ही सडेतोड, बिनतोड विद्रोहाची देणगी दिली असे आहे. ही देणगी खऱ्या अर्थाने मराठी कवितेत अपूर्व आहे, अनोखी आहे,५ असे प्रा. शुक्राचार्य गायकवाड हे सम्राट या जयंती अंकामध्ये म्हणतात.

निष्कर्ष :

१) समकालीन मराठीतील आंबेडकरवादी कवितांचा साहित्यावर पडलेला वेगळेपणाचा प्रभाव दिसतो.

२) मराठीच्या लिखाणात आंबेडकरी प्रेरणा व जाणिवा दिसून येतात.

३) मानवी जीवनाच्या सामाजिक जाणिवा बदलणारी आंबेडकरवादी कविता वाटते.

४) व्यथा, वेदना व विद्रोह कवितेच्या रुपाने टाहो फोडून व्यक्त होतात.

५) प्रस्थापितांना प्रामुख्याने सडेतोड उत्तर देण्याचे कामही आंबेडकरवादी कविता करत आहे.

६) विद्रोह हा आंबेडकरवादी कवितेचा पाठराखण करणारा शास्त्र व शस्त्र आहे.

७) आंबेडकरवादी कविता समग्र साहित्याला विस्तारित करण्याची ताकद त्यांच्यात असल्याचे कवितेतून पहावयास मिळते.

समारोप :

प्रत्येकच आंबेडकरवादी कविता विद्रोहाचे वादळ घेऊन येते. इथल्या शोषक अत्याचारी संस्कृतीची, परंपरांची, रुढींची, शब्दप्रभूची, ग्रंथांची, व्यवस्थेची, मूल्यांची ती सडेतोड काव्यपूर्ण समीक्षा मांडते. विषमतोल समाजावरील, आंविरोधात्मक समाजावरील केवढे भीषण भाष्य काव्यरूप करते. आंबेडकरवादी कवितेत उद्याच्या जगाला हवा असलेला 'उद्याचा सूर्य' दिसणार आहे. सामाजिक जाणिवेच्या विकासाचे रूप साकारल्याने आंबेडकरवादी कवितेत व्यक्त झालेले पहावयास दिसते. आंबेडकरवादी कवितेत या सामाजिक, सांस्कृतिक जाणिवेच्या विकासाची सर्व अंग प्रामुख्याने दिसतात. मराठी कवितेचे ज्या दिवशी संपूर्ण मूल्यभान जागे होईल. पुराणमूल्यांच्या सनातनी निद्रेतून जागी होईल, त्या दिवशी आजवर भूषण म्हणून मिरवलेले बरेचसे काव्याचे अलंकार फेकून देईल आणि आंबेडकरवादी कवींच्या कविता भूषण ठरतील. या अर्थाने मराठी आंबेडकरवादी कवितेचा प्रभाव असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

**संदर्भ टिपा :**

१) केशव मेश्राम, लोकराज्य विशेषांक, संपादकीय माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई, आक्टोबर २००६, पृ. ६०.

२) प्रा. विठ्ठल शिंदे यांचे लेख, सम्राट जयंती अंक, २००४, नेक्टर प्रिन्स प्रा. ली. घाटकोपर, मुंबई, पृ. ७२.

३) डॉ. यशवंत मनोहर, उत्थान गुंफा, कॉन्टीनेंटल प्रकाशन, किमयानगर, पुणे, २००१, पृ ८३.

४) डॉ. आशा धावडे यांची प्रस्तावना, वामन निंबाळकर, गावकुसाबाहेरील कविता आस्वाद आणि समीक्षा, सुगावा प्रकाशन, पुणे, ३०, पृ.०२.

५) प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांचे लेख, सम्राट जयंती अंक, २००४, नेक्टर प्रिन्स प्रा. ली. घाटकोपर, मुंबई, पृ. १०५.

– **मुन्नाभाई रेवचंद नंदागवळी**
**(संशोधक विद्यार्थी)**
**गोविंदराव वारजूकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभीड, जि. चंद्रपूर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**
**भ्रमणध्वनी : ९७६४६७६४९९**
**संकेतस्थळ:** munnabhai.swarkavya@gmail.com
**– प्रा. डॉ. अनमोल शेंडे**
**(संशोधक मार्गदर्शक)**
**गोविंदराव वारजूकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभीड, जि. चंद्रपूर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**
**संकेतस्थळ:** shendeanmol@gmail.com

# शिक्षणासाठी आपले घरच पहिले शिक्षण केंद्र : सुनेत्रा ताई पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आपले घर हे पहिली शिक्षण केंद्र असून व्यवसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी दर्जेदार शालेय शिक्षण खूप आवश्यक असून यातूनच शालेय शिक्षण व्यावसायिक महत्व विकास विकासात्मक आयुष्यभर आपण शिक्षक पालक कुटुंबातील व्यक्ती व संबंधित लोकांकडून शिकण्याची प्रत्येकातील त्यातला चांगला गुण अवगत करण्याची कला आपल्याकडे असली पाहिजे असे विचार करण्याचे असे आव्हान संस्थेची सचिव सौ सुनेत्रा ताई पवार यांनी केली आपल्या संस्थेतून चांगले उत्तम दादाची शिक्षण देण्यासाठी आपली संस्था बांधिल आहे आपल्या शिक्षणाचा फायदा कुटुंब व समाजातील लोकांना विकासानंद भूक लोकांच्या विकासासाठी ही करणे असे असे रुक्मिणी विद्यापीठाच्या संस्थापका सचिव सौ सुनेत्रा ताई पवार यांच्या शुभहस्ते भावांनो श्री सत्य साई यांच्या मातोश्री ईश्वरा मय्या व श्री शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांना पुष्पहार करून अभिवादन करण्यात आले रुक्मिणी विद्यापीठाने साम्य हा कर्मचारी दिवस म्हणू शिक्षकांना राबवण्याचा आव्हान करून शिक्षकांना दर्जेदार शिक्षण देण्याचे त्यांनी सांगितले उत्कृष्ट कर्मचारी म्हणून त्यांना उत्कृष्ट पुरस्कार देण्याचे देणार असल्याची त्यांनी सांगितले.

यावर्षी ते उत्कृष्ट कामगार म्हणून प्रमोद लक्ष्मण हुंगे लिपिक प्राथमिक विद्यामंदिर माता निर्मला देवी आशाताई अवघडे प्राथमिक विद्यामंदिर यांना रोख रक्कम व शाल व श्रीफळ देऊन सन्मानचिन्ह देऊन त्यांचा येतोचित सन्मान करण्यात आला हा पुरस्कार प्रत्येक वर्षी देण्याची त्यांनी जाहीर केले.

तर या कार्यक्रमात मातोश्री ईश्वर मया जुनिअर कॉलेजच्या एच एस सी २०२५ विशेष उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा विज्ञान शाखा चि रोहन अतिक मुल्ला ची आदित्य घाडगे वाणिज्य शाखा शिंदे प्रसाद शंकरराव ढोकळे प्रफुल्ल गौतम कला शाखा राजपाल गौतम नारायण रवी सुडके कृष्णा तुकारा यांचाही मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले हो अभिनंदन केली.

यावेळी बोलताना सावता संघटक रवींद्र साळुंखे यांनी सर्वांनी एक संग राहून चौथा विद्यार्थ्यांनी प्रगतीसाठी विविध उपक्रम राबवण्याचे शिक्षकांना आवाहन केले व दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना देणे देण्यासाठी आपण सकारात्मक भूमिका घ्यावी असे त्यांनी यावेळी सांगितले शिक्षकांनी दर्जेदार शिक्षण देण्याची त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात संस्था अंतर्गत च्या प्राथमिक माध्यमिक विभागातील सेवानिवृत्त झालेल्या होणाऱ्या शिक्षकांचे वसुधा कुंभार मीनाक्षी भोसले शुभ्र पांढरे सविता लोखंडे राजश्री फडतरे हरहाणा कादरी यांच्याशी सन्मानचिन्ह शाल व साडी चोळी देऊन येथे सत्कार केला व या सेवानिवृत्त शिक्षकांनी आपली



मनोगत व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी संस्था संस्थापक युवा नेते सुनंजय दादा पवार अध्यक्ष युवक काँग्रेस आय प्राचार्य नंदिनी गायकवाड मुख्याध्यापक संतोष कवडे काशिनाथ भोगाव यांचे सह रुक्मिणी परिवार व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभावरी दुबल यांनी केले तर आभार संविधान लोखंडे यांनी सांगितले या कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महेश भोसले काशिनाथ गोगाव कुमोदनी सरदार यांनी परिश्रम घेतली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### आधुनिक युद्धासाठी भारत सज्ज! पंतप्रधान मोदींनी पाकला सुनावले

ऑपरेशन सिंदूरनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पहिल्यांदाच देशाला संबोधित केलं. यावेळी त्यांनी धाडसी कारवाईबद्दल सैन्य दलांचं अभिनंदन केलं. पाकिस्तानला खडे बोल सुनावणाऱ्या पंतप्रधान मोदींनी न्यू एज वॉर फेयरमध्ये भारतानं आपलं श्रेष्ठत्व सिद्ध केल्याचा उल्लेख केला. यावेळी त्यांनी स्वदेशी संरक्षण उत्पादनांवर अधिक जोर दिला. मेक इन इंडियाच्या माध्यमातून भारतानं संरक्षण क्षेत्रातील आपलं परकीय अवलंबित्व कमी केलं. स्वदेशी क्षमतांना प्रोत्साहन देण्यात आलं. ऑपरेशन सिंदूरमधून भारतीय सैन्याची क्षमता दिसली, असं म्हणत मोदींनी मोदींनी मेड इन इंडियाचा विशेष उल्लेख केला. संरक्षण उत्पादनातील आत्मनिर्भरतेकडे त्यांनी लक्ष वेधलं. ऑपरेशन सिंदूरनंतर पंतप्रधानांनी पहिल्यांदाच देशाला संबोधित केलं.

# १७ ते १९ मे या काळात सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे गोवा येथे आयोजन

## सनातन संस्थेचे संस्थापक सचितानंद परब्रम्ह डॉक्टर आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सव सोहळा;

## देश–विदेशातून २५००० तर नाशिक जिल्ह्यातून ३५० हून अधिक हिंदूंची उपस्थिती राहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सनातन संस्थेचे संस्थापक सच्चितानंद परब्रम्ह डॉक्टर जयंत बालाजी आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सव आणि सनातन संस्थेच्या रोप्य महोत्सवी वर्षाच्या औचित्य साधून विश्वकल्यानार्थ रामराज्य समान सनातन राष्ट्राचा शंखनाद करण्यासाठी १७ ते १९ मे २०२५ रोजी या कालावधीत गोवा येथे सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे ऐतिहासिक आयोजन करण्यात आले आहे.

**■ या महोत्सवात सनातन राष्ट्रासाठी एक कोटीचा राम जप तज्ञ संत सभा!.**

**■ हिंदुराष्ट्ररत्न आणि सनातन धर्म श्री पुरस्कार वितरण:**

**■ लोककलेचे सादरीकरण आणि शिवकालीन शस्त्राचे प्रदर्शन:**

**■ संतांच्या पादुकांचे दर्शन : महाधन्वंतर यज्ञ असे विविध कार्यक्रम होणार आहेत.**

गोवा येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या या महोत्सवाला आर्ट ऑफ लिविंग चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकर जी, पतंजली योग पिठाचे संस्थापक परमपूज्य योग ऋषी रामदेव जी महाराज ,श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष परमपूज्य स्वामी गोविंददेव गिरीजी, सनातन बोर्डाचे प्रणेते पूज्यनीय देवकीनंदन ठाकुर जी महाराज ,केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ जी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोदजी सावंत छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णु देव राय, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे तेलंगाना येथील भाजपचे आमदार टी राजसिंह तसेच काशी मथुरा येथील मंदिराचा खटला लढवणारे आदिवासी शंकर जैन आधी अनेक मान्यवर या कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले आहे.

**या भव्य महोत्सवासाठी नाशिक येथून मंदिरांचे विश्वस्त – १८ मान्यवर**

यात सप्तशृंगी गड मंदिराचे दीपक पाटोदकर, सुदर्शन दहातोंडे, नाशिकरोड येथील मुक्तीधाम चे जगदीश चौहान, सीता गुंफा चे योगेंद्र गोसावी, विघ्नहरण गणपती देवस्थान डिजीपी नगर चे रवींद्र पाटील, कपालेश्वर मंदीराच्या श्रद्धा दुसाने, बालाजी मंदिराचे विक्रम बालाजीवाले, सीता गुंफा चे योगेंद्र गोसावी तसेच कोपरगाव येथील महेंद्र टुपके महाराज इ. तसेच हिंदुत्वनिष्ठ , साधक परिवार – ३४५ एकूण ३६३ उपस्थित राहणार आहेत.

# बेघर व कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना आता मिळणार हक्काचे घर

## ग्रामीण घरकुलासाठी ग्रामीण भागात युध्दपातळीवर सर्वे सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्ह्यातील एकही कुटुंब हक्काच्या निवाऱ्यापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांचा पाठपुरावा सुरू असून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ग्रामीण घरकुलासाठी पात्र असणाऱ्या कुटुंबांच्या सर्वेक्षणाचा अंतिम टप्पा सुरु आहे. सर्वेक्षणानंतर बेघर व कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना हक्काचे घर मिळणार आहे, अशी माहिती निफाड पंचायत समितीचे सहा. गटविकास अधिकारी सुनिल पाटील यांनी दिली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मध्ये झाले होते. सर्वेक्षणामध्ये तयार करण्यात केलेल्या प्रतीक्षा यादीत समाविष्ट न झालेले तसेच सिस्टीमद्वारे अपात्र झालेले परंतु सद्यस्थितीत पात्र कुटुंबांचे ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत सर्वेक्षण जवळपास १५ एप्रिलपासून सुरू झाले आहे. आवास प्लस २०२४ सर्वेक्षणातील बेघर, कच्च्या घरात राहणारी कुटुंबे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मध्ये तयार केलेल्या प्रतीक्षा यादीमध्ये समाविष्ट न झालेले परंतु सद्यस्थितीत पात्र असलेले कुटुंब, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत नवीन पात्र कुटुंबांचे सर्वेक्षण सुरु आहे. याबाबत ग्रामपंचायत अधिकारी, गटविकास अधिकारी तसेच प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमार्फत सर्वेक्षण केले जाणार आहे. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी कुटुंबांचे सर्वेक्षण केल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्र व लाभार्थ्यांचे स्वयंघोषित प्रमाणपत्र घेऊन त्याची पोच पावती संबंधित कुटुंबाला देण्यात येणार आहे. लाभार्थी १ आवास प्लस २०२४ द्वारे सर्वेक्षण करू शकणार आहेत. याबाबतच्या पडताळणीत चुकीची माहिती आढळून आल्यास कारवाई होणार आहे. कुटुंबाचे सर्वेक्षण केल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्र व पोहोच पावती ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे जमा करावी, त्याशिवाय सर्वेक्षण ग्राह्य धरले जाणार नाही.

### या कुटुंबांचा सर्वेक्षणात समावेश नाही

**१ )तीन व चारचाकी वाहन असलेले कुटुंब २ )तीन व चारचाकी कृषी उपकरण असणारी कुटुंब ३) किसान क्रेडिट कार्ड ५० हजार किंवा त्यापेक्षा अधिक क्रेडिट मर्यादा असलेली कुटुंब ४) कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी कर्मचारी असलेले कुटुंब ५) शासनाकडे नोंदणीकृत बिगर कृषी उद्योग असलेले कुटुंब ६) कुटुंबातील कोणताही सदस्य दरमहा १५ हजार पेक्षा जास्त कमवित असणारी कुटुंब ७) आयकर भरणारी, व्यावसायिक कर भरणारी कुटुंब ८)अडीच एकर किंवा त्याहून अधिक बागायती जमीन असणारी कुटुंब ९) पाच एकर पेक्षा जास्त परंतु जिरायती जमीन असणारी कुटुंब**

**प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन मध्ये गरज व पात्र लाभार्थ्यांचे सर्वेक्षण आवास प्लस सॉफ्टवेअर मध्ये करण्याचे काम सध्या सुरू आहे परंतु सदरची प्रक्रिया ही क्लिष्ट स्वरूपाची असल्याकारणाने सर्वेक्षण मंद/संथ गतीने सुरू आहे कोणताही वंचित लाभार्थी यामधून सुटता कामा नये यासाठी सर्वेक्षण करण्याची मुदत नसली पाहिजे जोपर्यंत पूर्व संरक्षण होत नाही तोपर्यंत सदर प्रक्रिया राबवली गेली पाहिजे**

**– राजेंद्र बोरगुडे, माजी सरपंच – नैताळे ग्रा.प.**





# संतश्रेष्ठ गोरोबा काका आयटीआय समिती सदस्यपदी ह. भ. प. महादेव महाराज आडसुळ व शिवाजी शिरसाट यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि, : सुधाकर रणदिवे, शहरातील संतश्रेष्ठ गोरोबाकाका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समिती तज्ञ नागरिक म्हणून ह भ प महादेव महाराज आडसुळ व रिपाईचे कळंब तालुकाध्यक्ष शिवाजी शिरसाट यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाकडून ही निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल ह भ प महादेव महाराज आडसुळ व रिपाईचे कळंब तालुकाध्यक्ष शिवाजी शिरसाट यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे..

# अक्कलकोट नगरपालिकेच्या गेल्या ४ वर्षातील ऑडिट करण्याची रिपाइंची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट नगरपालिकेला केंद्र व राज्य शासनाकडून विविध प्रकारचे अनुदान मिळते, पालिकेत त्याचे प्री ऑडिट होते मात्र पोस्ट ऑडिट होत नाही. किती अनुदान आले किती खर्च झाला शिल्लक किती? या बाबतचे गेल्या ४ वर्षातील ऑडीट करण्याची मागणी आर. पी.आय. आठवले गटाचे तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, राज्य मंत्री ना. माधुरी मिसाळ यांच्याकडे केली आहे.

मागणीत अविनाश मडीखांबे यांनी नमूद केले आहे कि, अक्कलकोट नगरपरिषदेत गेल्या ४ वर्षापासून प्रशासक राज आहे. गेल्या ४ वर्षात तत्कालीन मुख्याधिकारी सचिन पाटील यांच्या नंतर सध्या मुख्याधिकारी म्हणून रमाकांत डाके हे कार्यरत आहेत. सचिन पाटील हे कार्यरत असताना राज्य व केंद्र शासनाचा विविध योजनेचा निधी मिळाला आहे. या निधीतून मनमानी पद्धतीने विकास कामे हाती घेण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर विकास विभागाच्या मंजुरी नंतर कोठ्यावादी रुपयांची विकास कामे निकृष्ट दर्ज्याची झालेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने कारंजा चौकातील तारामाता उद्यान, नविन राजवाडा रोड, व्ही. आय. पी. रस्त्यावरील लहान मुलांकरिता लाखो रुपयांचे खेळाचे मनोरंजनात्मक साहित्य बसविण्यात आली हे देखील मनमानी पद्धतीने निविदा कडून सदरचे काम मर्जीतील ठेकेदारास देऊन पूर्ण करण्यात आले. मात्र सदर लोकार्पण अध्यापही झालेले नाही. याबरोबरच त्यांच्या काळात रस्ता स्वच्छ करण्याचे भले मोठे ट्रक घेण्यात आले, चक्क ते नगरपरिषदे समोर गेल्या २ वर्षापासून धूळ खात पडून आहे.



सध्या श्री क्षेत्र अक्कलकोट मध्ये तीर्थ क्षेत्र विकास निधी सोडून कोठ्यावधी रुपयांची कामे सुरु आहेत. या सह यात्रा अनुदान, राज्य नगरोत्थान, रस्ता अनुदान, यात्रा अनुदान, या केंद्र व राज्य शासनाच्या निधीच्या माध्यमातून कामे देखील सुरु आहेत. ही कामे सध्या मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या अधिपत्याखाली सुरु आहेत. यांच्या व तत्कालीन मुख्याधिकारी सचिन पाटील यांच्या कार्यकाळात विकास कामे व निधीचे लेख परीक्षण व्हावे अशी मागणी आर. पी.आय. आठवले गटाचे तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, राज्य मंत्री ना. माधुरी मिसाळ यांच्याकडे केली आहे.

आयलॅन्डन चा कारंजा अन शहराला १५ दिवसाला पाणी पुरवठा– शहराला सांगवी जलाशयात मुबलक पाणी असताना नगरपरिषदेच्या नियोजन अभावी १२ ते १५ दिवसाला प्रभागनिहाय पाणी पुरवठा केला जातो. शहराची लोकसंख्या व तरंगती लोकसंख्या पाहता गेल्या अनेक वर्षापासून श्री क्षेत्र अक्कालकोटची पाणी व्यवस्था कोलमडलेलीच आहे. आशा स्थितीत देखील नगरपरिषदेकडून ए–वन चौकातील आयलॅन्डन चा कारंजा सुरु ठेऊन जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार वेळोवेळी घडत आहे. कुरनूर असो वा सांगवी, धरण उशाला कोरड घश्याला अशी अवस्था शहरवासीयांची झाली आहे.

**– अविनाश मडीखांबे**
**आर.पी.आय. आठवले गटाचे तालुका अध्यक्ष**

## माढा तालुकास्तरीय खरीप हंगामपुर्व नियोजन बैठक संपन्न

## शेतकऱ्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवा : आमदार अभिजीत पाटील

# शेतकऱ्यांची फसवणूक खपवून घेणार नाही : आमदार अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : केंद्र व राज्य शासन शेतकरी हिताच्या अनेक योजना राबवित असून त्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा असे आवाहन माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी केले आहे. खरीप हंगामाच्या नियोजनासाठी पंचायत समिती, कुर्डूवाडी येथे तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन आढावा बैठकीच आयोजन करण्यात आले होते.

**खरीप हंगाम पूर्व नियोजनाची बैठक पार पडली. हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सर्व अधिकारी प्रशासनाने आवश्यकती तयारी करावी. बियाणे, खते व कीडनाशके यांचा पुरवठा वेळेत आणि योग्य दराने करावा. कुणीही शेतकऱ्यांची फसवणूक केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.**

**– आमदार अभिजीत पाटील.**

### माढाचे आमदार अभिजीत पाटील व करमाळ्याचे आमदार नारायण पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती बैठक पार पडली

करमाळ्याचे आमदार नारायण आबा पाटील, जि.प.सदस्य भारत आबा शिंदे, नगराध्यक्षा मीनलताई साठे, भारतनाना पाटील, बाळासाहेब ढवळे, सुर्वणा शिवपुरे, जिल्हाकृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले, वाकडे एस. ज्योतीताई कुलकर्णी, बाळासाहेब पाटील, तालुका कृषीअधिकारी अविनाश चंदन, मिरगने आदींची उपस्थिती होती.

या बैठकीत खरीप हंगामातील पेरणी पूर्वतयारी, बियाणे आणि खतांचा पुरवठा, कीड नियंत्रणाचे उपाय शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना मोहिमा याविषयी सविस्तर माहिती शेतकऱ्यांना मिळाली.



शेतकऱ्यांना वेळेत बियाणे व खत कसे उपलब्ध होईल याबाबत नियोजन करावे अशा सुचना केल्या असून गेल्या काही हंगामांमध्ये बी–बियाण्यांबाबत अनधिकृत दर आकारणी केल्याने शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यास खपवून घेणार नसल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले. 'शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी आपण स्वतः लक्ष घालणार असून, वेळेवर व योग्य दरात शेतकऱ्यांपर्यंत कृषी सेवा पोहोचावी यासाठी प्रशासनाने पूर्ण तयारी ठेवावी. अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

# सामाजिक बांधिलकीचा आदर्श!

## अनिलभाऊ नावंदर यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त सेवासंकल्प संस्थेला ६५ क्विंटल अन्नधान्य भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी : सामाजिक जाणीवेतून केलेली मदत हीच खरी मानवसेवा असते, याचा एक उत्कृष्ट नमुना चिखली तालुक्यातील पळसखेड सपकाळ येथील सेवासंकल्प सेवा संस्था येथे पाहायला मिळाला. महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे मानद सचिव अनिलभाऊ नावंदर यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त, बुलढाणा जिल्हा केमिस्ट परिवाराच्या वतीने सेवासंकल्प संस्थेला ६५ क्विंटल अन्नधान्य भेट म्हणून प्रदान करण्यात आले.या विशेष उपक्रमाचे आयोजन सेवाभावी आणि सामाजिक जाणीवेतून करण्यात आले. जीवनभर समाजासाठी कार्य करणाऱ्या नावंदर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आल्याने तो अधिक अर्थपूर्ण ठरला.या कार्यक्रमास जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सचिव, विविध तालुक्यांतील प्रतिनिधी,स्थानिक मान्यवर,तसेच सेवासंकल्प संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांनी मिळून संस्थेचे कार्य प्रत्यक्ष पाहिले आणि तिथे राहणाऱ्या निराधार, मनोरुग्ण, वयोवृद्ध व्यक्तींशी संवाद साधला. त्यांच्या सेवेसाठी संस्थेने उभारलेली व्यवस्था पाहून उपस्थितांमध्ये समाधान व प्रेरणा निर्माण झाली.




**सेवासंकल्प संस्थेचे कार्य आणि महत्त्व:**

पळसखेड सपकाळ येथील सेवासंकल्प संस्था ही गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील बेवारस,बेसहारा, मनोरुग्ण, दिव्यांग, वयोवृद्ध, महिला, आणि लहानग्यांसाठी आधार देण्याचे कार्य करत आहे. कोणताही भेदभाव न करता,अत्यंत मायेने आणि आत्मीयतेने या संस्थेत राहणाऱ्यांची देखभाल केली जाते.अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार, मानसोपचार या सर्व गोष्टींची उत्तम सोय येथे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**नावंदर यांच्या सामाजिक योगदानाची गौरवशाली परंपरा:**

अनिलभाऊ नावंदर हे केवळ केमिस्ट संघटनेचे नेते नसून एक सामाजिक कार्यकर्ता म्हणूनही ते आेळखले जातात. अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, महिलासक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात त्यांनी केलेले योगदान उल्लेखनीय आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली केमिस्ट संघटना केवळ औषधव्यवसायापुरती मर्यादित राहिलेली नसून, सामाजिक बांधिलकी जपत अनेक गरजूंना मदतीचा हात देणारी संस्था बनली आहे.

**संस्थेच्या वतीने आभारप्रदर्शन:**

सेवासंकल्प संस्थेचे प्रमुख नंदू पालवे यांनी केमिस्ट संघटनेचे व अनिलभाऊ नावंदर यांचे आभार मानले व सांगितले की, आजच्या या धकाधकीच्या काळात कोणीतरी आपल्यासाठी विचार करतो, मदतीचा हात पुढे करतो, हे खूप मोठं आहे. नावंदर सरांचा वाढदिवस आमच्यासाठी 'उत्सव' ठरला.

हा उपक्रम म्हणजे केवळ एक मदत नव्हे,तर सामाजिक जागृतीचा एक आदर्श आहे. वाढदिवस साजरा करण्याच्या पद्धतीतून समाजसेवेचा संदेश देणाऱ्या अनिलभाऊ नावंदर यांच्यासारख्या व्यक्तीमुळेच समाजात सकारात्मक बदल शक्य होतो. त्यांच्या या उपक्रमाने सामाजिक संस्थांसोबतच सामान्य नागरिकांनाही प्रेरणा मिळाली असल्याचे जिल्हा संघटनेचे पदाधिकारी प्रशांत ढोरे पाटिल यांनी म्हटले आहे. याप्रसंगी बुलढाणा जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन शिंदे, सचिव रामुसेठ आयलानी,अमरावती संघटन सचिव राजेंद्र नहार, महाराष्ट्र औषधी परिषदेचे सदस्य तथा डीआयसी प्रमुख गणेश बंगळे, उपाध्यक्ष राजेश पाटील,सह सचिव प्रशांत ढोरे पाटिल, कोषाध्यक्ष जगदीश नावंदर,चिखली तालुका अध्यक्ष स्वप्निल तायडे, जिल्हा प्रतिनिधी सुनिल पारसकर, निलेश गावंडे, योगेश चांडक, शरद सपकाळ, समिर पाटिल, गोपाल मानतकर, अक्षय जांबोंदे, धर्मेश शहा, अभिजीत निंबाळकर, रवि वडते, चंद्रशेखर बरोटे,अजय जैन, नंदू काळे,नंदू कांडेकर, नितीन ठोसरे, गणेश भेरडे, श्रीकांत बाळकर, सुभाष पाटील, गणेश चांडक, सुरेश थारकर, विनोद नागवानी, बद्री पानगोळे, वैशाली सरोदे, रामू भोजवाणी, गणेश माळी,मधुकर गव्हाणे, सचीन गाडेकर, पवन मैंद,पवन सावळे, सर्जेराव भुते, सचिन जगताप, सचिन पडघान, पोहरकर सर,निलेश सकळकर, किशोर बढे, राहूल दवे,राजेश गोंधणे, जयंत शर्मा, नीरज लद्धा, अब्दुल्ला भाई पठाण, शुभम सुरडकर, प्रणव कोठारी, अरुण मोळवने, स्वप्निल कुलकर्णी, सुचित भराड आदिंनी उपक्रमात सहभाग नोंदवला आहे.

# कार्ला बौद्ध लेणी येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त हजारोंच्या उपस्थितीत महाबुद्धवंदना संपन्न

## भिक्खू संघाच्या उपस्थितीत महाबुद्धवंदनेचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनीधी : २५६९ व्या बुद्ध पौर्णिमेनिमित्त कार्ला बौद्ध लेणी, मावळ, पुणे येथे आदरणीय भिक्खू संघाच्या उपस्थितीत महाबुद्धवंदनेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमात आदरणीय भंते धम्मानंद यांच्यासह ३० श्रामणेर, हजारो उपासक - उपासिका व स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

याप्रसंगी सकाळी १० वाजता महाबुद्धवंदना व सुत्तपठण घेण्यात आले त्यानंतर आदरणीय भंते धम्मानंद यांनी उपस्थित उपासकांना धम्म देसना देत भगवान गौतम बुद्ध यांच्या विश्वशांतीचा मार्ग सांगितला. तसेच अहिंसा, मैत्री-भाव, पंचशील, अष्टांग मार्ग यांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले. त्यानंतर महाराष्ट्रातील सर्व लेणी संवर्धन संघटना यांच्यातर्फे भिक्खू संघास व उपासकांना भोजनदान करण्यात आले.

कार्ला बौद्ध लेणी लोणावळ्याजवळ वेहेरगाव येथे बौद्ध भिक्खुसाठी इ.स. पूर्व पहिल्या शतकात कोरण्यात आली. कार्ला लेणीमध्ये जम्बुद्विपातील सर्वात मोठे चैत्यगृह व स्तूप कोरण्यात आलेला आहे. कार्ला लेणी थेरवाद व महायान या दोन्हीही प्रमुख बौद्ध शाखेच्या एकीचे प्रतीक मानले जाते. या लेणीतील भगवान बुद्ध, बोधिसत्व, हत्ती, पिंपळाकृती कमानी, बौद्ध राजे-राण्या, मोठे स्तंभ अशी सुबक व कोरीव शिल्पे प्राचीन भारतीय कलेची साक्ष देतात.




# निलंगा येथे संविधान सन्मान सभेचे भव्य आयोजन; डॉ. राजरत्न आंबेडकर यांचे सविस्तर मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निलंगा (विशेष प्रतिनिधी ) - भारतीय संविधानाच्या गौरवशाली परंपरेचा सन्मान राखत संविधान सन्मान सभा या भव्य कार्यक्रमाचे आयोजन लातूर चे लोकप्रिय माजी खासदार प्रा. डॉ. एडवोकेट सुनील बळीराम गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आणि भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर होते. त्यांनी उपस्थितांना संविधानाचे महत्त्व, समतेचा संदेश आणि सामाजिक न्यायाचे मोल यावर सविस्तर व प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या कार्यक्रमात सर्व राजकीय पक्षांचे नेते मंचावर एकत्र उपस्थित होते, ज्यामुळे सामाजिक ऐक्य आणि संविधानाच्या सार्वभौमिक मूल्यांचा आदर अधोरेखित झाला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुनील बळीराम गायकवाड म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. राजरत्न आंबेडकर हे भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून अतिशय चांगले काम करत आहेत. देश-विदेशात बौद्ध समाजाचे प्रश्न मांडण्याचे, त्यावर उपाययोजना सुचवण्याचे आणि जागतिक स्तरावर बौद्ध विचारांचा प्रसार करण्याचे कार्य ते समर्थपणे पार पाडत आहेत. आम्ही सारे बौद्ध आपल्या सोबत आहोत. भारत बौद्धमय करण्याचं स्वप्न आपण साकार करूयात.

या सभेला विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. संविधान सन्मान सभेच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांची जपणूक, आणि समता, बंधुता व न्यायाचे विचार रुजवण्याचा प्रयत्न झाला. कार्यक्रमाला निलंगा तालुक्यातील उपासक उपासिका मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# मोहा येथे जगाला शांततेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : सुधाकर रणदिवे दि.१२/०५/२०२५ रोजी मोहा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह या ठिकाणी जगाला शांततेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मोहा येथील रहिवासी आणि अंबड तालुका येथील कार्यरत असलेले शिक्षक मा.महेश मडके हे उपस्थित होते. यावेळी बोलताना मडके सर यांनी संपूर्ण जगाला युद्धची नाही तर बुद्धाची गरज आहे. हे आवर्जून सांगितले, यावेळी ऑल इंडिया पॅन्थर सेना जिल्हा अध्यक्ष अशोक कसबे, जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष बाबासाहेब कसबे, सचिव अजय कसबे ,शुभम कांबळे, तानाजी कसबे, मोहा ग्रामपंचायत सदस्य महावीर कसबे, राहुल कसबे, मिलिंद कसबे, आश्रुबा नागटिळक, गणेश कसबे, सुखदेव मडके, अरविंद हिरवे, मोठ्या प्रमाणात महिला व समाज बांधव उपस्थित होते.

सोमनाथ कसबे यांनी उपस्थित सर्व बांधवाना स्वखर्चातून खीर वाटप करण्यात आली .

# गौतम बुद्धाची शिकवण आचरणात आणावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : भगवान गौतम बुद्धांनी अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य या तत्वांची शिकवण दिली त्यामुळे सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील दुःख नष्ट होण्यास मदत झाली. त्यांनी दिलेली मानवतेची शिकवण जगाच्या उन्नतीसाठी महत्त्वाची असल्यामुळे ती आचरणात आणली पाहिजे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात बुद्ध पौर्णिमेनिमित्त अभिवादन कार्यक्रम

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील कॉमर्स असोसिएशन कडून आयोजित केलेल्या बुद्ध पौर्णिमा निमित्त अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अंबणप्पा भंगे, मलकप्पा भरमशेट्टी, कॉमर्स असोसिएशन प्रमुख प्रा शिल्पा धुमशेट्टी, प्रा शितल फुटाणे, प्रा जनाबाई चौधरी, शरणय्या मसुती, रवींद्र कालीबत्ते आदी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना केली. राजपुत्र अवस्थेचा त्याग करून जनतेसाठी संन्यासी जीवन स्वीकारले, चांगले कर्म करा, आचरण शुद्ध ठेवा, नेहमी सत्य बोला, शांततेचा मार्ग स्वीकारा, इतरांना मदत करा अशी शिकवण त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ बाळासाहेब पाटील यांनी केले, आभार शिल्पा धूमशेट्टी यांनी मानले.

### गौतम बुद्धांच्या जीवनातील अपूर्व योग

**गौतम बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती व महानिर्वाण या तिन्ही घटना पौर्णिमेच्या दिवशी घडल्या त्यांनी सर्वसामान्य जनतेसाठी दिलेल्या योगदानामुळे त्यांच्या जीवनात हा अपूर्व योग आला असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.**

### युद्ध नको बुद्ध हवा

**मानवाने जीवनात शांततेचा मार्ग स्वीकारला पाहिजे असा संदेश भगवान गौतम बुद्धांनी दिला. परंतु आज युद्धाचा मार्ग अवलंबला जात आहे ही घटना मानवतेला विनाशाकडे घेऊन जात आहे. त्यामुळे युद्ध नको बुद्ध हवा असे म्हणण्याची वेळ आली आहे असे ही मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले.**

# श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर फेवर ब्लॉकचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : बिटरगाव येथे विधानपरिषद आमदार विक्रांत दादा पाटील यांच्या आमदार निधीतून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर ह्यावर ब्लॉक बसवण्यासाठी दहा लाख रुपये निधी दिला होता त्याचे उद्घाटन महेश भैया डोंगरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी बिटरगाव सरपंच कुलदीप पाटील माजी सरपंच गणपत बसले ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर सोनवणे माजी सरपंच साहेबराव हजारे हरिदास दुबळ नानासाहेब मुळीक परमेश्वर मुळे महादेव लोंढे संतोष घोंगडे अजित मोहिते अनिल टकले दादासाहेब सोनवणे दत्तू बेंद्रे बबन सरडे शिवाजी मुळे कृष्णा मोहिते दादासाहेब डोंगरे पाटील इत्यादी उपस्थित होते.

# जीवनात गुरुशिवाय पर्याय नाही



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : आईशिवाय जन्म नाही तसेच गुरुशिवाय मोक्ष नाही. त्यामुळे जीवनात येऊन गुरु करावा व तुळशीशीची पवित्र माळ घालावी. गुरूंनी सांगितलेल्या गुरुमंत्राचा जप करावा. जीवनात फक्त साधना तारते तर देवाचे नाम मोक्ष मिळवून देतो,या जीवनात गुरुशिवाय पर्याय नाही, असे आशिर्वचन पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संस्थांनाचे सह-अध्यक्ष सद्गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले.

लोहारा तालुक्यातील करवंजी येथील श्री हनुमान मंदिरात रौप महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताह सोहळ्यानिम्मित आयोजित किर्तन सेवेत औसेकर महाराज यांनी श्री संत एकनाथ महाराज यांच्या नमावे हे नित्य सद्गुरूचे पाय ! आणिक उपाय करू नका !!गुरुचरणावीण मानू नका काही ! वेदशास्त्र पाही हेची सांगे !!एका जनार्दनी गुरुचरणसेवा ! प्रिय होय देवा सर्वभावे !! या अभंगावर निरूपण केले. आपण नेहमी सद्गुरूच्या चरणांना नमन करा आणि इतर उपायांची गरज नाही.सद्गुरूच्या मार्गदर्शनावर आणि त्यांच्या कृपेवर विश्वास ठेवा आणि इतर साधनांपेक्षा जास्त लक्ष देऊ नका. सद्गुरूच्या चरणांना नमन करणे हेच आपल्यासाठी सर्वोत्तम उपाय आहे. देवाचे नाम मोक्ष मिळवून देतो,परमार्थात मनोनिग्रह आणि इंद्रिय निग्रह अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे देवाचे नामस्मरण करणाऱ्याला भगवंतापर्यंत पोहचण्यास कसलीही आडकाठी नाही. गुरूंनी दिलेल्या मंत्राचा जप करावा, कोणताही संप्रदाय,धर्म, पंथ असो त्याचे नाव बदलत असेल तरीही तत्व मात्र बदलत नाहीत. प्रत्येकानी देव देवतांचा, गुरूंचा आदर केला पाहिजे. विठ्ठल नामात खूप ताकद आहे.आचरणातुनच जीवनाची वाटचाल सकारात्मक दिशेने जाते.असे गुरुवर्य गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

### औसेकर महाराज यांचे करवंजी येथे प्रतिपादन

याप्रसंगी व्यासपीठ अधिकारी कमलाकर बेडगे, गुलाब पांचाळ महाराज, सुग्रीव कोळी गुरुजी , नागनाथ कोळी, पोपट हाक्के, शेखर सगर , काशिनाथ करके, रमेश लामजने, नवनाथ शिंदे महाराज , चंद्रकांत हेंडले, मोहन गुरव,सतीश मुगळे,मुळे महाराज तसेच करवंजी व परिसरातील सुपतगाव, तोरंबा, हराळी, कोरळ, हिप्परगा, येणेगूर, सालेगाव येथील भजनी मंडळ सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बँकॉक येथील सर्वात मोठ्या बुद्ध विहारात रामदास आठवलेंनी बुद्ध पौर्णिमा साजरी केली

## संपूर्ण विश्वात बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

# जगाला युद्धाची नाही भगवान बुद्धांची गरज; विश्वशांतीचा, मानवतेचा बुद्धविचार माणसामाणसापर्यंत पोहोचवा : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बँकॉक / मुंबई दि.१२ शांतीशिवाय विकास नाही; न्याय नाही; जीवनात आनंद नाही. भगवान बुद्धांनी दिलेला विश्वशांतीचा मानवतेचा बुद्धविचार माणसापर्यंत पोहोचवला पाहिजे. जगाला युद्धाची नाही तर भगवान बुद्धांच्या विचारांची गरज आहे असे सांगत ना.रामदास आठवले यांनी जगभरातील बौद्धांना बुद्ध जयंती च्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज बँकॉक मधील सर्वात मोठ्या वॅट फो या ऐतिहासिक बुद्धविहारात बुद्ध पौर्णिमे निमित्त बुद्धवंदना बुद्धपूजा करून बुद्ध जयंती साजरी केली. थायलँड मध्ये बुद्धपूजा प्रार्थना वंदना संपूर्णपणे पाली भाषेत आहे. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला बौद्ध धम्माची दिक्षा देऊन मोठी क्रांती केली आहे.इतिहास घडविला आहे. धर्मांतर करून बौद्ध धम्माची दीक्षा घेण्याचा डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा निर्णय क्रांतिकारक ठरला आहे. सम्राट अशोकानंतर महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात केलेले धम्मचक्रप्रवर्तन ही जगातील सर्वात मोठी धम्मक्रांती ठरली आहे असे ना.रामदास आठवले म्हणाले.

भारतात स्थापन झालेला बौद्ध धम्म जगभरातील ८० देशांत पोहोचला आहे.जगात बौद्धांची लोकसंख्या तिसऱ्या क्रमांकाची आहे. बुद्ध विचार हा माणसाला माणूस बनविणारा माणसाच्या मनातील अहंकार दूर करणारा विचार आहे.भगवान बुद्धांशिवाय जगाला पर्याय नाही असे सांगत ना.रामदास आठवले यांनी संपूर्ण जगभरातील बौद्धांना बुद्ध जयंती च्या शुभेच्छा दिल्या आहेत.

बँकॉक मधील वॅट फो या बुद्धविहारात ना.रामदास आठवले यांनी बुद्ध जयंती साजरी केली त्या बुद्धविहाराला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भेट दिली होती. तिथे आज ना.रामदास आठवले यांनी सपत्नीक भेट देऊन बुद्धपूजा केली.यावेळी ना. रामदास आठवले यांच्या पत्नी सौ. सीमाताई आठवले, राज वासनिक; चंद्रशेखर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.